बीड । मंगळवार
१७.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ७७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# शासनाचे अनुदान घेऊन... संस्था चालक पालकांचे खिसे रिकामे करू लागले !

## बीडमध्ये मराठी शाळा संस्था चालकांचा मनमानी कारभार !

## इंग्रजी शाळेच्या पाठोपाठ मराठी शाळेने ही पालकांची लूट चालवली !

## मराठी सेमी इंग्रजी मध्ये प्रवेशासाठी २५ ते ३० हजाराची मागणी! नमंकित शाळेचा सहभाग; जिल्हा परिषद शिक्षण विभाग झोपेत

**गरीब विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यायचे नाही का? शिक्षण अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची पालकांची मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात बाजार मांडला असल्याचे चित्र सर्वत्र दिसू लागले आहे. एकीकडे मराठी माध्यमाच्या शाळावर गदा येत आहे तर दुसरीकडे बीड शहरातील अनेक नामवंत शाळांनी आपल्या फीस मध्ये भरमसाठ वाढ केली असल्याने मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षण अनुदानित शाळांमध्ये होणे अवघड झाले आहे. एकीकडे इंग्रजी शाळांची फीस प्रति वर्षाप्रमाणे वाढत जात असून यामध्ये आता राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त शाळा ही सहभागी होऊ लागल्या आहेत. एका विद्यार्थ्याच्या प्रवेशासाठी तब्बल २५ ते ३० हजार रुपयांची डोनेशन ची म ागणी संस्था चालकाकडून केली जात असून विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाऊनही प्रवेशासाठी डोनेशनची मागणी करत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना




बाजूला करत डोनेशन देणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्याचा घाट काही संस्था चालकांनी घातला आहे. विशेष म्हणजे या शाळा गेल्या अनेक वर्षापासून ज्ञानदानाचे काम करत आहे. राज्य शासनाकडून यासाठी १००% अनुदान घेतले जात आहे. मराठी माध्यमाच्या शाळातही भरमसाठ फी वसूल केली जात असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. शिक्षण क्षेत्रातील या मनमानी कारभाराला जिल्हा परिषद शिक्षण विभाग चाप लावणार का ? बीड जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात अनेक घोटाळे उघड होत आहे माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागात झालेले घोटाळे राज्यभर गाजत असताना विभागीय स्तरावर चौकशी सुरू असल्याची माहिती आहे. यातच बीड जिल्ह्यात नामांकित इंग्रजी शाळा विद्यार्थ्याकडून डोनेशनच्या नावाखाली मोठी रक्कम लाटत आहे. यामध्ये अनेक ठिकाणी इंग्रजी शाळेत सुविधा नसलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# परळी शहरातील उदगीरकर व डुबे कुटुंबीयांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन



**परळी वै. । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी वैद्यनाथ शहरातील उदगीरकर व डुबे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. शहरातील प्रसिद्ध व जुने व्यापारी शंकर अप्पा उदगीरकर यांचे नुकतेच निधन झाले होते, त्याचप्रमाणे प्रसिद्ध व्यापारी भगवानराव डुबे यांचेही अल्पशा आजाराने निधन झाले होते. या दोन्ही कुटुंबीयांची धनंजय मुंडे यांनी आज भेट घेऊन ▶▶ उर्वरित पान २ वर

# पंढरीची वारी... 18 अन् 19 जूनला प्रस्थान; संत ज्ञानेश्वर अन् तुकाराम महाराजांच्या पालखीचं वेळापत्रक समोर

**पुणे । प्रतिनिधी**

पावसाळ्याला सुरुवात होताच विठुरायांच्या भक्तांना ओढ लागते ती पंढरीच्या पांडुरंग भेटीची. आषाढी एकादशीच्या वारीत पाऊले चालती पंढरीची वाट, माऊली.. माऊली... म्हणत मार्गक्रमण करण्याची. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरीच्या वारीसाठी हजारांहून अधिक दिंड्या येतात. तर, मानाच्या १० ▶▶ उर्वरित पान २ वर






# आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याने मुर्शदपुर ग्राम पंचायतला सर्वाधिक घरकुले मंजूर : सरपंच अशोक मुळे


**• आ.धस यांचे मानले आभार**

**आष्टी । प्रतिनिधी**

पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २०२५-२६ करिता मुर्शदपुर कासारी शिदेवाडी ग्रुप ग्रामपंचायत साठी ४४० घरकुले आमदार सुरेश धस यांनी केलेल्या वेळोवेळी पाठपुराव्याने मंजूर केले. असून केंद्र सरकार,राज्य सरकार व



लोकाभिमुख नेतृत्व आमदार सुरेश धस यांचे आभार मुर्शदपुर, कासारी, शिदेवाडी ग्रामपंचायतचे



सरपंच अशोक मुळे यांनी मानले आहेत. आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार ▶▶ उर्वरित पान २ वर

# पेठ बीड पोलीसांची अवैद्य धंद्यावर कार्यवाही ४२,७५०/-रु.चा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, मोमीनपुरा येथे एक ईसम ईलेक्ट्रोनिक साहित्याचा वापर करून व्हिडिओ गेमवर कमी पैशावर जास्त पैशाचे आमीश दाखवून लोकांना व्हिडिओ गेम खेळवित आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाल्यावरून



आम्ही सोबत पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व सोबत पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक चालक पोह/१७५८ इम्रान यांनी आमिन ▶▶ उर्वरित पान २ वर

# जेवणाचे बिल देण्यावरून कोयत्याने वार ; पाच जणांवर अंबाजोगाईत गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर त्याचे बिल देण्यावरून कोयत्याने हल्ला केल्याची घटना अंबाजोगाई येथील रिंग रोडवरील एका हॉटेलम ध्ये घडली आहे. याप्रकरणी पाच जणांवर अंबाजोगाईत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शनिवारी (दि.१४) रात्री १० वाजता काहीजण जेवण करण्यासाठी हॉटेल रस्सा

येथे आले. येथे जेवण केल्यानंतर बिल देण्यावरुन वाद झाला. यानंतर त्यांनी काही जणांना बोलावून घेत फिर्यादीला कोयता व फायटरने मारहाण करुन जखमी केले. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. या आशयाची फिर्याद किशोर भारत देवकर यांने दिली. या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात आरोपी अक्षय जाधव, करण जाधव इतर तिघे अनोळखी असे पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार आर्मूळ हे करीत आहेत.

## खतांच्या स्टॉकची आकडेवारी समोर आणा, कृत्रिम टंचाई किंवा लिंकिंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा : धनंजय मुंडे यांच्या कृषी अधिकाऱ्यांना सूचना

# परळी मतदारसंघात खत पुरवठा तातडीने सुरळीत करण्याच्या सूचना

**परळी वै. । प्रतिनिधी**

पेरणीच्या तोंडावर काही डीलर्स स्वतः कडे खताचा साठा असूनही तो लपवत असल्याचा व कृत्रिम टंचाई निर्माण करत असल्याच्या तक्रारी येत असून, कृषी विभागाकडूनही काही प्रमाणात खत येणे बाकी असून आवश्यक साठा तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा, तसेच स्थानिक डीलर्स कडे उपलब्ध असलेल्या साठ्याची आकडेवारी तात्काळ समोर आणावी, अशा सूचना आज माजी कृषमंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी खत व्यवस्थापन प्रमुख तसेच स्थानिक



तालुका कृषी अधिकारी यांना केल्या आहेत. जून अखेर परळी मतदारसंघात आवश्यक असलेल्या युरियासह, डीएपी व अन्य आवश्यक खतांच्या साठ्यामध्ये जो फरक आहे, तो फरक रेक लावून तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशीही धनंजय मुंडे यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधत सूचना केल्या.

खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणे तसेच प्रमुख मागण्या असलेली व नामांकित खते डावलून जाणीवपूर्वक लिंकिंग करत निकृष्ट दर्जाची खते पर्याय म्हणून जबरदस्तीने विकणाऱ्या डीलर्स व दुकानदारांची नावे उघड करून ▶▶ उर्वरित पान २ वर

# ऑनलाइन घरकुलासाठी कोणालाही पैसे देऊ नये नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

सध्या घरकुल ऑनलाईन करण्याची प्रक्रिया १८ तारीख असल्याचे समजते तरी काही दलाल गोरगरीब लोकांना अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून लोकांच्या खिशावर अधिकाऱ्याच्या संगणमताने डल्ला मारण्याचे काम करत असल्याचे सध्या दिसत आहे तरी अशा दलालखोर लोकांना कोणीही पैसे देऊ नयेत ऑनलाईन प्रक्रिया ही स्वतः सेल्फ आपल्या मोबाईल वरती करण्यासाठी मोदी सरकारने लोकांच्या हितासाठी ही योजना केलेली आहे एका मोबाईल वरती एकच घरकुल ऑनलाईन करता येते या घरकुल योजनेच्या वेबसाईटवर जाऊन त्या ठिकाणी आपले आधार लिंक नंबर टाकून नाव नोंदणी करण्यात यावी याच्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला व त्याच्या दलाला



कोणत्याही नागरिकांनी पैसे देऊ नयेत जर कोणी पैसे मागण्याचा प्रयत्न करत असेल तर डायरेक्ट आमच्याशी संपर्क साधावा किंवा पोलीस प्रशासनाचे अँटीकरप्शन पोलीस यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे बीड जिल्ह्यामध्ये नगर प्रशासन ग्रामपंचायत पंचायत समिती ▶▶ उर्वरित पान २ वर



# जागतिक शिक्षणाचा केंद्रबिंदू मुंबईत भारतातील पहिले आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे शैक्षणिक हब महाराष्ट्रात

देशाच्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत भारतात शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio – GER) ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत.तसेच महाराष्ट्रातही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे महाराष्ट्रात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, पारदर्शक भरती प्रक्रिया, विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना देणे यावर अधिक भर देऊन उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल घडवत राज्यातील शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, लोकाभिमुख केले जात आहे याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने मुंबई/नवी मुंबई येथे पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे स्वतंत्र कॅम्पसेस उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला असून भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात हा मैलाचा दगड ठरणार आहे.

पहिल्या टप्प्यात सहभागी आंतरराष्ट्रीय विद्यापीठे

University of Aberdeen – स्कॉटलंड, University of York – युनायटेड किंगडम, University of Western Australia – ऑस्ट्रेलिया, Illinois Institute of Technology – अमेरिका, Istituto Europeo di Design (IED) – इटली

या पाच नामवंत विद्यापीठांनी मुंबईत आपले शैक्षणिक केंद्र स्थापन करण्यास सहमती दर्शवली आहे. त्यांना केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (UGC) परदेशी विद्यापीठांना दिले जाणारे LOI (Letter of Intent) प्रदान करण्यात येणार आहे. या विद्यापीठांपैकी अनेक संस्था त्यांच्या देशात टॉप १०० मध्ये आहेत आणि Go8, Russell Group किंवा आयव्ही लीग यांसारख्या उच्च दर्जाच्या संघटनांशी संलग्न आहेत. भारतातील त्यांच्या कॅम्पसेसना पदवीपूर्व, पदव्युत्तर, पीएच.डी., डिप्लोमा आणि संशोधन कार्यक्रम राबवण्यासाठी पूर्ण स्वायत्तता आणि मान्यता देण्यात आली आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण, देशातच विद्यार्थ्यांना आता जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम, संशोधन संधी आणि अनुभव परदेशी न जाता देशातच उपलब्ध होतील. हे शिक्षण केवळ परदेशी अभ्यासक्रमांची प्रतिकृती न राहता, भारतातील स्थानिक गरजांशी सुसंगत व रोजगारक्षम असेल. हे अभ्यासक्रम स्थानिक औद्योगिक गरजांनुसार अनुकूल केले जातील. संशोधन, स्टार्टअप्स आणि उद्योग सहकार्याला चालना मिळेल.विद्यार्थ्यांना एक्स्चेंज प्रोग्राम्स, सेमिस्टर ट्रान्सफर, ग्लोबल इंटर्नशिप्स यांसारख्या संधी उपलब्ध होतील. आणि प्राध्यापक व संशोधक यांचाही आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग वाढेल.

प्रत्येक विद्यापीठाचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान

University of Aberdeen (स्कॉटलंड)

भारतामध्ये कॅम्पस स्थापन करणारे पहिले स्कॉटिश विद्यापीठ. जागतिक समस्यांवर उपाय शोधणाऱ्या अभ्यासक्रमांवर विशेष भर.

University of Western Australia (Go8)- STEM, व्यवसाय आणि संशोधन क्षेत्रातील अभ्यासक्रम. भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक कार्यबलासाठी सक्षम करणे हे मुख्य उद्दिष्ट.

University of York (UK – Russell Group)- एआय, सायबर सुरक्षा, बिझनेस आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीजसाठी विशेष अभ्यासक्रम. जागतिक उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम डिझाइन.



Illinois Institute of Technology (USA)- इंजिनिअरिंग, संगणक विज्ञान आणि बिझनेस क्षेत्रात अग्रगण्य. Elevate प्रोग्रामच्या माध्यमातून संशोधन, इंटर्नशिप आणि रिअल-वर्ल्ड अनुभव.

Istituto Europeo di Design (IED – इटली) फॅशन, प्रॉडक्ट डिझाईन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशन क्षेत्रात कौशल्याधारित, क्रिएटिव्ह शिक्षण देणारे प्रतिष्ठित संस्था आहेत.

राज्य शासन केवळ परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारत नाही, तर महाराष्ट्रातील विद्यापीठांनाही आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधी प्रदान करत आहे.यामध्ये Twinning, Dual Degree आणि Joint Degree कार्यक्रम संशोधन सहकार्य व विद्यार्थी-प्राध्यापक आदान-प्रदान असून उद्यमशीलता व नवोन्मेषावर आधारित आहे त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता वाढविणे या सहकार्यामुळे राज्यातील विद्यापीठांचे ग्लोबल रँकिंग सुधारण्यास मदत होईल, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील करिअर व संधी उपलब्ध होतील आणि उद्योग-संस्थांशी थेट जोडले जातील

मुंबई रायजिंग – क्रिएटिंग ॲन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी" या महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमाअंतर्गत, पाच जागतिक स्तरावर प्रसिद्ध परदेशी विद्यापीठांना मुंबई आणि नवी मुंबईत त्यांच्या कॅम्पसची स्थापना करण्यासाठी इरादापत्रे (LOIs) अधिकृतपणे प्रदान केली जाणार आहेत. यामध्ये ॲबर्डीन विद्यापीठ (Aberdeen University), यॉर्क विद्यापीठ (University of York), वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ (University of Western Australia), इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (Illinois Institute of Technology) आणि इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (Istituto Europeo di Design – IED) या विद्यापीठांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थित पार पडणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली, सिडकोमार्फत उभारल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय एज्युसिटीमुळे संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी मिळणार असून, हे शिक्षण विविध संस्कृतींच्या आदान-प्रदानाला चालना देईल आणि विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये सहकार्य व संवाद वाढवेल. भारतामध्येच आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणे आणि परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस महाराष्ट्रात स्थापन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी प्रकल्पाच्या अंतर्गत, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पाच किलोमीटर परिसरात सर्वोच्च 10 परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारण्याचे नियोजन आहे. ही देशातील पहिली अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी ठरणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल आणि महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे आर्थिक लक्ष्य २०२९ पर्यंत साध्य करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक ठरेल. हा उपक्रम म्हणजे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वज्ञानाचा शैक्षणिक अविष्कार आहे. महाराष्ट्राची ही वाटचाल केवळ राज्यापुरती मर्यादित नसून, ती नव्या भारताच्या ज्ञानाधिष्ठित विकासाची दिशा दर्शवणारी आहे.

-काशीबाई हनुमंत थोरात धायगुडे
विभागीय संपर्क अधिकारी

पान १ वरून पुढे...

## शासनाचे अनुदान...

शाळा सहभागी आहेत. शैक्षणिक दर्जा खालवत जात असताना फीस मात्र वाढत जात आहे. यातच आता बीड शहरात नमकीत असणाऱ्या संस्था विद्यार्थ्याकडून डोनेशनच्या नावाखाली अक्षरशः लूट करत आहे. अनेक नामकेत शाळा २५ ते ३० हजार रुपयांची मागणी प्रवेशासाठी करत असल्याने पालकांची डोकेदुखी वाढली आहे. राज्य शासनाकडून शंभर टक्के अनुदानित असणाऱ्या या शाळेंना आता विद्यार्थ्याकडून फीस वसूल करत नेमके काय साध्य करायचे आहे. बीड मधील खाजगी शाळांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे. फिस च्या नावाखाली पालकांचे लूट सरासपणे होत असताना जिल्हा परिषद शिक्षण विभाग झोपेत आहे का असा प्रश्न पालक वर्गाकडून उपस्थित केला जात आहे. मराठी अनुदानित शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्याकडून डोनेशन घेणे योग्य आहे का असा सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे. बीड शहरातील नमूद शाळांना फीस वाढीचे भूत लागले आहे का राज्य शासनाकडून अनुदान घेत खाजगी शाळा सारखे फीस वसूल करणे या शैक्षणिक संस्था विरोधात कठोर कारवाई होणे आवश्यक झाले असून मुख्य कार्यकारी अधिकारी हे अशा संस्था चालकांना व त्यांच्या बगलबच्चांना कायद्याचा धाक दाखवतल का ? असा खडा सवाल पालक वर्गातून व्यक्त केला जात आहे.

## परळी शहरातील...

त्यांच्या कुटुंबियांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा देत मृतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करुन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, जयपाल लाहोटी, चेतन सौंदळे, कुमार व्यवहारे, शंकर कापसे यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## पंढरीची वारी..

पालख्यांसह हजारो वारकरी भक्तीत तल्लीन होऊन विठुनामाचा गजर करत असतात. ऊन, पाऊस, वादळ, वारा कशीचीही तमा न बाळगता आपल्या लाडक्या बा विठ्ठलाच्या भेटीची ओढ घेऊन पुढे चालत असतात. यंदा ६ जुलै रोजी आषाढी एकादशी असून त्यासाठी वारकऱ्यांची पायी वारी सुरू झाली आहे. पंढरीच्या वारीसाठी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून येणाऱ्या मानाच्या पालख्यांमध्ये देहू येथून जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी येते. आता, या दोन्ही पालख्यांची प्रस्थान, आगमन आणि पंढरीतून परतीच्या प्रवासाचे वेळापत्रक जारी करण्यात आलं आहे. त्यानुसार, अनुक्रमे १८ आणि १९ जुलै रोजी संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे पंढरीकडे प्रस्थान होत आहे.

पान १ वरून पुढे...

संत ज्ञानेश्वर महाराज पायी सोहळा वेळापत्रक :

१९ जून माऊली पालखी प्रस्थान आळंदी ( प्रस्थान गुरुवारी आल्यामुळे संध्याकाळी आठ वाजता प्रस्थान होणार )

२० जून आळंदी ते पुणे,

२१ जून पुणे मुक्काम

२२ जून पुणे ते सासवड, ( दिवेघाट वारकरी खेळ )

२३ जून सासवड मुक्काम

२४ जून सासवड ते जेजुरी, ( भंडाऱ्याची उधळण )

२५ जून जेजुरी ते वाल्हे, (जेजुरी खंडोबा दर्शन )

२६ जून वाल्हे ते लोणंद,(माऊलींना निरास्मान व सातारा जिल्हा प्रवेश)

२७ जून लोणंद ते तरडगाव

२८ जून तरडगाव ते फलटण

२९ जून फलटण ते बरड

३० जून बरड ते नातेपुते (सोलापूर जिल्हा प्रवेश व बरड येथे गोल रिंगण)

०१ जुलै नातेपुते ते माळशिरस (सदाशिवनगर येथे गोल रिंगण)

०२ जुलै माळशिरस ते वेळापूर (खुडूस येथे गोळ रिंगण)

०३ जुलै वेळापूर ते भंडी शेगाव (ठाकूर बुवा समाधी गोल रिंगण आणि टप्पा येथे बंधू भेट सोहळा)

०४ जुलै भंडी शेगाव ते वाखरी (बाजीराव विहीर येथे उभे रिंगण)

०५ जुलै वाखरी ते पंढरपूर, प्रवास व पौर्णिमेपर्यंत पंढरपूर मुक्काम वाखरी येथे गोल रिंगण

०६ जुलै देवशयनी आषाढी एकादशी

१० जुलै पंढरपुरातून आळंदीकडे परतीचा प्रवास

संत तुकाराम महाराज पायी सोहळा वेळापत्रक २०२५ :-

१८ जून : प्रस्थान इनामदार वाड्यात मुक्काम

१९ जून :देहू निगडी आकुर्डी प्रवास व आकुर्डी मुक्काम

२० जून: आकुर्डी ते पुणे नाना पेठ मुक्काम

२१ जून :निवडुंगा विठ्ठल मंदिर पुणे मुक्काम

२२ जून: पुणे हडपसर लोणी काळभोर प्रवास आणि मुक्काम

२३ जून :लोणी काळभोर ते यवत प्रवास व मुक्काम

२४ जून :यवत वरवंड चौफुला प्रवास व मुक्काम

२५ जून : वरवंड ते उंडवडी गवळ्याची प्रवास व मुक्काम

२६ जून : उंडवडी गवळ्याची ते बारामती प्रवास व मुक्काम

२७ जून : बारामती काटेवाडी सणसर पालखीतळ मुक्काम ( काटेवाडी येथे मेंढी बकऱ्यांचे रिंगण )

२८ जून : संसर बेलवाडी, निमगाव केतकी प्रवास मुक्काम

पान १ वरून पुढे...

(बेलवडी येथे पहिले गोल रिंगण)

२९ जून : निमगाव केतकी ते इंदापूर प्रवास व मुक्काम
(इंदापूर येथे गोल रिंगण )

३० जून : इंदापूर ते सराटी पालखीतळ प्रवास आणि मुक्काम

१ जुलै : सराटी ते अकलूज प्रवास व मुक्काम (अकलूज येथे गोल रिंगण व सोलापूर जिल्ह्यात आगमन)

२ जुलै : अकलूज ते बोरगाव प्रवास व मुक्काम
(माळीनगर येथे उभे रिंगण )

३ जुलै : बोरगाव ते पिराची कुरोली प्रवास आणि मुक्काम

४ जुलै : पिराची कुरोली ते वाखरी पालखीतळ मुक्काम
(बाजीराव विहीर येथे उभे रिंगण )

५ जुलै : वाखरी ते पंढरपूर मुक्काम
(वाखरी येथे उभे रिंगण )

६ जुलै : एकादशी नगरप्रदक्षिणा आणि चंद्रभागा स्नान

१० जुलै : पंढरपुरातून देहूकडे परतीच्या प्रवासाला सुरुवात

## आ.सुरेश धस...

संघाचे भाग्यविधाते व सर्व अठरापगड जातीला सोबत घेऊन विकासगंगा मतदारसंघात आमदार सुरेश धस यांच्या रूपाने येणार असून पंतप्रधान घरकुल योजनेअंतर्गत आष्टी मतदार संघाला १८ हजार ७ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. यामध्ये कासारी मुर्शदपुर शिदेवाडी ग्रामपंचायत साठी ४४० घरकुले आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने मंजूर झाले असून यासाठी त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे.यामध्ये सर्व जाती धर्मातील लाभार्थ्यांना हा लाभ मिळणार असून या लाभार्थ्यांनी आमदार सुरेश धस यांचे जाहीर आभार मानले आहेत. यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा, आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे करावेत.घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे ऑनलाइन प्रणाली मार्फत करून घ्यावेत म्हणजे लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा होण्यास सुलभ जाईल. माझ्या ग्रामपंचायतला आमदार सुरेश धस यांनी सर्वाधिक घरकुले मंजूर करून दिल्याबद्दल केंद्र सरकार, राज्य सरकार व सदैव जनसेवेत असलेले नेतृत्व आमदार सुरेश धस यांचे जाहीर आभार कासारी,मुर्शदपूर,शिदेवाडी ग्रामपंचायतचे सरपंच अशोक मुळे यांनी मानले आहेत.

## पेठ बीड...

मेडिकल मोमीनपुरा च्या बाजूला गेमझ् गोन नावाचा बोर्ड असणा-

पान १ वरून पुढे...

या गाळयामध्ये छापा टाकला असता वर नमूद वर्णनाचे इलेक्ट्रानिक गेमचे साहित्य व्हिडिओ गेम चालविणारा शेख इम्रान शेख दस्तगीर वय २८ वर्षे रा. मोमीनपुरा हा जागीच मिळून आला व गेम खेळणारे लोक आम्हा पोलीस पार्टीस पाहून पळून गेल्याने पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गु.र.नं. १७१/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदया प्रमाणे गुन्हा नोंद करून आरोपी च्या ताब्यातील व्हिडिओ गेमचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण एकूण ४२,७५०/- रूपायाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत साहेब, . अप्पर पोलीस अधीक्षक सो सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक, चालक पोह/१७५८ इम्रान सर्व नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली.

## खतांच्या स्टॉकची...

त्यांच्यावरती तातडीने शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असेही सूचना धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. खरीप हंगामाच्या तोंडावर खत बियाण्यांच्या पुरवठ्यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, यासाठी बफर स्टॉक सह यापुढील प्रत्येक घडामोडीची आकडेवारी सह माहिती देण्यात यावी याबाबतही धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. यावेळी प्र. तहसीलदार श्रीमती पठाण, ए डी ओ गरांडे, परळी व अंबाजोगाई चे तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी संजय केंद्रे, अजय मुंडे, अभय मुंडे, राजाभाऊ पौळ यांसह आदी उपस्थित होते.

### जनता संवाद, गर्दी अन् जागच्या जागीच तोडगा, धनंजय मुंडेंचा दरबार पुन्हा गजबजला...!

धनंजय मुंडे जिथे जातील तिथे गर्दी, आपल्या समस्या, अडचणी व मागण्या घेऊन येणारे कार्यकर्ते व सामान्य नागरिक आणि त्याच ठिकाणी त्यांच्या समस्यांवर जागच्या जागीच तोडगा काढणारे धनंजय मुंडे, असे धनंजय मुंडे यांच्या जनता दरबाराचे स्वरूप सबंध राज्याला परिचित आहे! आजापणामुळे व विविध आघात सहन केल्यानंतर काही दिवस विश्रांती घेऊन पुन्हा सक्रिय झालेल्या धनंजय मुंडे यांच्या भोवती पुन्हा तितक्याच ताकदीने परळी मतदारसंघ, बीड जिल्हा इतकेच नव्हे तर जिल्हा बाहेरून देखील कार्यकर्ते व सामान्य नागरिकांची गर्दी जमा होऊ लागली असून, त्यांच्या समस्या व मागण्या जाणून घेत जागच्या जागीच त्यावर तोडगा काढण्याची धनंजय मुंडे यांची प्रचलित कार्यपद्धती पुन्हा एकदा पाहायला मिळते आहे.

पान ४ वरून पुढे...

## विद्युत सुरक्षा...

घराबाहेर घ्यावयाची खबरदारी- खेळ वाहिनीच्या तारा, विजेचा पोल, ताण तार या पासून लांब खेळावे. घराच्या छतावर, गच्चीवर वावरत असताना वीज वाहिनी जवळून गेलेली असल्यास लोखंडी सळी, ओली काठी त्या जवळ नेवू नये. पाण्यात उभं राहून विद्युत मोटार सुरू करू नये, मोटारच्या वायरला शक्यतो जोड असु नये असल्यास जोडवर योग्य इन्सुलेशन टेपचे आवरण असावे. शेतातील मोटार व स्टार्टर पेटीला योग्य वायरिंग व सक्षम अर्थिंग असावी. वीज चोरी करू नये किंवा अनधिकृत जोडणी करू नये. शेत कुंपणात वीज प्रवाह सोडू नये. तुटलेल्या किंवा लोंबकळलेल्या विद्युत तारा, वायर, झुकलेले पोल या पासून लांब रहावे. वीज वाहिनीच्या तारा खाली थांबू नये, वीज वाहिनी खाली पीक / साहित्य साठवू नये. असे विद्युत निरीक्षण विभाग, विद्युत निरीक्षक सु. भा. चौधरी यांनी कळविले आहे.

पान ४ वरून पुढे...

## शाहीन अकादमीच्या...

तिने मिळविलेल्या यशामुळे प्रसिद्ध एम्स मध्ये तिची एमबीबीएस साठी जागा निश्चित झाली आहे. या दणदणीत निकालामुळे शाहीन अकॅडमी बीड कडून अल्मा आणि तिच्या पालकांचा विशेष सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात नवीद उज्जमा, फखरुज्जमा, डॉक्टर फिरोज शेख, माजी उपनगराध्यक्ष फारुख पटेल, जमीयत उलमा ए हिंदचे बीड जिल्हाध्यक्ष मुफ्ती अब्दुल्ला, मौलाना साबीर, अश्फाक इनामदार, ज्येष्ठ पत्रकार सी.आर.पटेल, पत्रकार जावेद पाशा, नबिल उज्जमा, गुलाम साकिब, मुज्तबा खान सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट बीडचे शाखाप्रमुख प्रा.डॉ. इम्रान मुनीर खान यांनी आभार व्यक्त केले.

## लाखो शेतकरी...

पान ४ वरून पुढे...

नारायणगाव (पुणे) येथील गोफार्मली कलेक्शन सेंटरला सदिच्छा भेट दिलेल्या सर्व शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व शेतक-यांना मोलाचे मार्गदर्शन केले या भेटी वेळी प्रवीण पवार सर, मंगेश गवारे मामा, गणेशजी निजवे सर, शेखलालभाई पठाण, बाबाभाई सय्यद, सामाजिक कार्यकर्ते हाजी शफीकभाई शेख, नसीरभाई सय्यद. आदीजन उपस्थित होते.

## जि.प.ची...

धोका निर्माण झाला आहे. गटशिक्षणाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शाळेच्या इमारतीचा मालक या शाळेत काही दुर्घटना घडली तर जबाबदार असतील. लवकरात लवकर ही शाळा स्थलांतरित करावी किंवा इतरत्र हलवावी. अन्यथा मोठा अनर्थ होऊ शकतो. याला जिल्हा परिषद शिक्षण विभाग कारली होत असेल.तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी या भागातील शाळा शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे.

पान ४ वरून पुढे...

## मंत्री सावे...

डॉ. महेश कुमार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या अगोदर देखील अडीच वर्षांपूर्वी बीडचे पालकमंत्री असताना सावे साहेबांनी पीएचडी मिळाल्याबद्दल बीड येथे डॉ. महेश कुमार वनवे यांचा सत्कार केला होता. त्यांच्या नवीन येत असलेल्या शेतकऱ्यांच्या आयुष्यावर आधारित चित्रपटाबद्दलही त्यांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी रत्नदीप टॉकीज चे संचालक विनोद अग्रवाल उपस्थित होते.

## सौ.केशरबाई सोनाजीराव...

निराकरण करण्याचा कृषी दुतांनी प्रयत्न केला. डॉ. जी. व्ही. साळुंखे , प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे डॉ. एस.टी. शिंदे , प्रा. एस. एस.राठोड ,पी.ए .गायकवाड मॅडम व उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक बी.बी. तांबोळकर सर यांचे मार्गदर्शन लाभले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# चला शाळेला... सुट्या संपल्या : जिल्ह्यात उत्साहात गावोगावी शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत

## १०० शाळात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने प्रवेशोत्सव सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

वांगी येथे सोमवार दि १६ जून रोजी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जि. प. कें. प्रा. शाळा , वांगी येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आली . या प्रसंगी विदयार्थ्यांना पुष्पगुच्छ , पुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने आज जिल्हाभरात विविध विभागाचे अधिकारी सकाळीच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी पोहोचले. विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी , पहिल्या दिवसापासूनच हजेरी वाढावी आणि एकंदरीतच शैक्षणिक वातावरण निर्मिती व्हावी हा या मागचा उद्देश आहे. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व स्वतः जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विविध शाळांमध्ये उपस्थित होते .



वांगी येथे शाळेत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी १०० टक्के विद्यार्थ्यांची पटनोंदणी व्हावी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या इयत्ता १ ली च्या पटात लक्षणीय वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत , गावातील अंगणवाडी व बालवाडी यांना शिक्षकांनी भेट देऊन त्यातील इयत्ता पहिलीमध्ये दाखल पात्र विद्यार्थी यादी घ्यावी व त्यांचा प्रवेश करून घ्यावा, जिल्हा परिषद शाळांमधील सोयी सुविधा , शिष्यवृत्ती , विविध उपक्रम याबाबत पालकांना माहिती द्यावी अशा सूचना शिक्षकांना दिल्या.विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सर्व शिक्षक प्रयत्नांची पराकष्ठा करत असून या शाळेमधून अनेक गुणवंत विद्यार्थी घडत आहेत असे सांगितले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्फूर्त प्रतिसाद होता . त्यांनी शाळेत मध्यान्ह आहार उत्तम असतो , शाळेत मोफत पुस्तके मिळतात इ. माहिती दिली.

ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर यांनी नमूद केले की गावातील सर्व नागरिकांना , शेतकऱ्यांना वेळेवर सुविधा पुरविण्यात येतात. सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा. तसेच जिवंत सातबारा मोहीम दोनचा लाभ घ्यावा . सध्या महाराजस्व अभियान सुरू आहे , त्या अनुषंगाने महसूल विभागाच्या अनेक योजनांचा आपण लाभ घेऊ शकता, असेही त्यांनी सांगितले .

या कार्यक्रमास ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर, अशोक वाघमारे, केंद्रप्रमुख आजिनाथ हाडूळे, मुख्याध्यापक निरंजन धनवे, मुख्याध्यापक निरंजन धनवे, अशोक वाघमारे , बाबुराव शेळके ,महादेव शेळके, शिक्षक आनंद शिंदे , सी. एस.सी.चालक रोहित राऊत , इतर शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नफरवाडीतील चिमुकले शाळेत आले बळीराजाच्या रथातून

### जावे आनंदाच्या गावा । दयावा आनंद आणि आनंदचि घ्यावा।।

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील नफरवाडी गावच्या आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्वागत बळीराजाच्या रथातून करण्यात आले. सकाळी सकाळी झाडावर पाखरांची पिलं आणि रस्त्यावर शाळेची मुलं किलबीलताना पाहुन ४५ दिवस मनाला सुट्टीमुळे आलेली मरगळ क्षणार्धात चैतन्यात रुपांतरीत झाली. प्रवेशोत्सव व शाळापूर्वतयारी मेळावा. दि १६ रोजी शाळेत ई १ लीत प्रवेशित होणाऱ्या चिमुकल्यांची बैलगाडीतून वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शा.व्य. समितीचे उपाध्यक्ष अशोक वाघ तर प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या सरपंच विद्याताई बंडू सवासे, अध्यक्ष उत्तरेश्वर औटे, माजी अध्यक्ष भारत ढेरे, शा. व्य .समितीचे सदस्य तथा शिक्षणप्रेमी सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय सावंत सर,माजी सरपंच बंडू सवासे, शा.व्य. समिती सदस्य बाळू ढोले, रविकांत वणवे, दगडू मंडलिक, अशोक मंडलिक, अतिष तांबे, परमेश्वर औटे, भारत तळेकर, लक्ष्मण कवडे, ईश्वर तांबे, नानासाहेब तांबे, विष्णू ढेरे, इत्यादी होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन श्री.मुरूमकर सर यांनी, प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री खंडागळे सर यांनी तर आभारप्रदर्शन.राऊत सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. खंडागळे सर, मुरूमकर सर, राऊत सर, काकडे मॅडम, वावरे मॅडम तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.



# श्रीमंतयोगी आश्रम शाळेत प्रवेशोत्सव साजरा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बहिरवाडी भागात असणाऱ्या श्रीमंतयोगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक निवासी आश्रम शाळेत सोमवार दिनांक १६ रोजी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या बाबत अधिक माहिती अशी की बीड शहरातील बहिरवाडी भागात असणाऱ्या श्रीमंतयोगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक निवासी आश्रम शाळेत सोमवार दिनांक १६ रोजी नवीन शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ मध्ये नव्याने शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभाग बीड चे निरीक्षक लक्ष्मण बारगजे यांच्या प्रमुख उपस्थितीत व शुभहस्ते पाठ्यपुस्तके, सर्व शैक्षणिक साहित्य, खाऊ, गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मनोगतामध्ये लक्ष्मण बारगजे यांनी आश्रम शाळेमध्ये विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी अतिशय चांगल्या सुविधेसह दर्जेदार शिक्षण व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग नोंदवून नावीन्यपूर्ण कामगिरी आश्रम शाळेतील सर्व शिक्षक करत असल्याचे सांगितले. आश्रम शाळेतील विद्यार्थी आज डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी, राष्ट्रीय खेळाडू अशा विविध क्षेत्रात पोचलेले आहेत. शिवाय आश्रम शाळेतील विद्यार्थी हा आपलाच पाल्य समजून त्यांची वैयक्तिकरित्या काळजी घेण्याचा अनमोल सल्ला दिला. यावेळी श्री. प्रसाद शुक्ला, श्री. कोलंगडे सर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. भडके एन. एम. माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. धुमाळ एम. एम. तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# कै. बि. दे. राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

**बीड । प्रतिनिधी**

राजस्थानी सेवा समाज संचलित कै. बि. दे. राठी राजस्थानी प्राथमिक विद्यालय सहयोग नगर या शाळेत १६ जून या दिवशी प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री. डावकर सर, श्री. एकशिंगे सर श्री. सिकची सर, श्री. पंडित सर, सौ. धारूरकर मॅडम, सौ. राडीकर मॅडम, सौ. कुलकर्णी मॅडम, सौ. सारडा मॅडम, उमेश कोठी, रमेश शिंदे, गीता शिंदे यांनी परिश्रम घेतले.




## कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड

### -: जीपचा जाहिर लिलाव :-

या बाजार समितीच्या मालकीची महिंद्रा कंपनीची स्कार्पिओ S112WD चालू स्थितीत असलेली गाडी क्रमांक MH-23 AS-3999 चा जाहिर लिलाव दिनांक २०/०६/२०२५ रोज शुक्रवार या दिवशी दुपारी (१:००) वाजता या कार्यालयात ठेवलेला आहे. तरी गरजूंनी अनामत रकम रू. (२०,०००/-) या कार्यालयात लिलावापूर्वी जमा करावी. त्या शिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. तसेच ज्यांचे नांवे लिलाव मंजूर होईल त्यांने लिलाव झाल्यावर तीन दिवसात जीप विक्रीची ५०% रक्कम भरावी व उर्वरित ५०% रकम सात दिवसात जमा करावी. नसता आपली अनामत रक्कम जप्त केली जाईल. तसेच पूर्ण रकम कार्यालयात जमा केल्या शिवाय गाडीचा ताबा दिला जाणार नाही.

**शर्थी:-**

१. जीपची विक्री आर. टी. ओ. ने काढलेल्या किंमतीस अधिन राहुन केली जाईल.
२. जीप दिनांक १७/०६/२०२५ ते २०/०६/२०२५ या दरम्यान सुट्टी खेरीज कार्यालयात पहावयास मिळेल.
३. बाजार समितीचे सदस्य/ कर्मचारी/ त्यांचे नातेवाईक यांना लिलावात भाग घेता येणार नाही.
४. जीप विक्रीचे सर्व अधिकार कार्यालयाने राखुन ठेवले आहेत.

**सौ. सरला कामराज मुळे**
**सभापती**
**कृ.उ.बा.स.बीड**

**बाळासाहेब जाधव** — **सचिव** — **कृ.उ.बा.स.बीड**

शिक्का

**शामसुंदर पडुळे** — **उपसभापती** — **कृ.उ.बा.स. बीड**


# खून करण्याच्या उद्देशाने मारहाण केल्याच्या आरोपीला जामीन मंजूर

**बीड । प्रतिनिधी**



सदर घटना तक्रार दार यांनी समक्ष सरकारी दावाखना वार्ड क्र.४८ मध्ये विचारले वरून जबाब दिला की, दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ८.४५ वा. चे सुमारास माझे वडील यांनी मला फोन केला व म्हणाले की तू बार्शिनाका येथे जावून हिना पेट्रोल पंपाचे शेजारी गेलो व तेथून एका व्यक्तीकडून यांचेकडून पन्नास हजार रूपय घेवून ये..परत येत असताना लेंडी रोडने तकिया मस्जिदच्या समोर भगवान विद्यालय जवळ आलो असता मला मित्राने आवाज दिला व म्हणाला तू कोठे चाललास त्यावर मी त्याला म्हणालो बीशीचे पैसे घेवून घरी देण्यासाठी चाललो आहे त्यावर मला मित्र म्हणाला की, बीड हायस्कुल येथे गॅदरींग चालू आहे आपण बघायला जावू असे म्हणाल्याने मी व तो, असे आम्ही दोघे बीड हायस्कुल येथे जावून गॅदरींगचा कार्यक्रम पाहत होतो त्यावेळी तेथे विशाल थोरात, आण्णा थोरात, लक्ष्मण थोरात, गणेश थोरात, राम थोरात असे माझ्या जवळ आले व मला विशाल थोरात यांने नाव विचारले त्यावर मी त्याला माझे नाव सांगितले त्यावर ते म्हणले चल साईडला ये असे म्हणून आम्हां दोघांना गेटच्या बाहेर रोडवर आणले व म्हणाले ये तुम्ही दोघे येथे कशाला आलात असे म्हणून शिवीगाळ करून मला राम थोरात, लक्ष्मण थोरात, गणेश थोरात या तीघांनी माझे हात धरले त्यानंतर आण्णा थोरात याने त्याचे हातातील कोयत्याने माझ्या डोक्यात मारून गंभीर दुखापत केली व विशाल थोरात याने त्याच्या हातातील रॉडने पाठीवर दोन्ही हातावर, गुडग्यावर, फासोळीवर मारूण मुक्कामार दिला डोक्यात मारल्याने डोके फूटून रक्त निघत होते मी जोरात ओरडलो असता मला सोडवण्यासाठी माझा मित्र आला असता त्याला विशाल थोरातने नाकावर चाकू मारून गंभीर दुखापत केला त्यामुळे त्याचे नाकाचे हाड फॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी मला सांगितले तसेच विशाल थोरातने पुन्हा त्याच्या डोक्यावर रॉडने मारून दुखापत केली आमच्या भांडणनाचा आवाज ऐकूण गॅदरींग मधिल लोक जमा झाले त्यांनी आमचे भांडण सोडविले भांडण सोडवायच्या आगोदर आण्णा थोरात व विशाल थोरात यांने माझ्या खिशातील बीशीचे पन्नास हजार रूपय काढून घेतले त्यानंतर तेथे जमलेल्या लोकांन पैकी एक जणाने मला व माझा मित्र यास सरकारी दावाखाना बीड येथे आणून तेथिल डॉक्टरांना दाखविले डॉक्टरांनी आम्हां दोघांना तपासून वार्ड क्र. ४८ मध्ये भरती केले सध्या माझी प्रकृती चिंताजनक आहे.

तरी माझ्या डोक्यात कोयता मारून गंभीर दूखापत करणारे व माझा मित्र याच्या नाकावर मारून त्याचे नाकाचे हाड फॅक्चर करणारे आण्णा थोरात, विशाल थोरात, राम थोरात, लक्ष्मण थोरात, गणेश थोरात याचे विरुध्द माझी तक्रार आहे. त्यानुसार सदरील आरोपीच्या विरुद्ध बीड शहर पोलीस स्टेशन येथे गु र न २१/२०२५ गुन्हा दाखल करण्यात आला.. सदरील आरोपीनी अॅड योगेश टेकाडे यांच्या मार्फत न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. न्यायालयीन सुनावणी दरम्यान आरोपींचे वकील अॅड योगेश टेकाडे यांचा युक्तिवाद ऐकून पहिले सत्र न्यायाधीश व्ही एच पाटवदकर साहेब यांनी जामीन अर्ज मंजूर केला. त्यांना अॅड वैभव होळकर, अॅड.भोपळे, अॅड दिलीप राठोड यांनी सहकार्य केले.



ओमकार लक्ष्मण मात्रे यांची महावितरण मध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा... देताना मा. नगरसेवक आत्माराम आण्णा जमाले, त्रिंबक कदम, अशोक गोरे, अजय कदम, दै. मराठवाडा पत्रचे तालुका प्रतिनिधी संभाजी लांडे आदींनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या


## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. मनिषा एस. पठारे, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ८८० / २०२५**

अर्जदार - १. सुनिता भ्र. धर्मराज मिरगे, वय - ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेकनूर, ता. जि. बीड, २. गणेश पि. धर्मराज मिरगे, वय - ३० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३.महेश पि. धर्मराज मिरगे, वय २८ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ४. आशा भ्र. अनिल जगताप, (आशा पि. धर्मराज मिरगे ) वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंधापुरी घाट, ता. जि. बीड,

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **धर्मराज पि. मारुती मिरगे या दि. २४/०४/२०२१ रोजी नेकनुर, ता.जि. बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तर अर्जदार क ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांकः- १३/०६/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीख :- २८/०७/२०२५.**

**( मार्फत विधिज्ञ: - श्री एस. बी. शिंदे )**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३६/२०२५**

**नारायण बन्सी घोडके, विरुद्ध ग्रा.पं. कार्या शिवनी**

पहा,

**नारायण बन्सी घोडके, रा. शिवणी ता. जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **नारायण बन्सी घोडके,** यांचा दिनांक ०७/०६/१९९१ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरक्षण अर्जदार यास जन्मची नोंद ग्राम पंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **शिवणी** ता.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत

असेल तर ही जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालय **शिवणी** ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०६/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०६/२०२५ ही आहे.

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड.**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ८६४/२०२५**

**सिन्धुबाई व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार : (१) सिन्धुबाई छगनराव दहिवाळ वय ८४ वर्ष, धंदा घरकाम, रा. सावता माळी चौक, दुधाळ बिल्डींग, बीड, ता.जि. बीड, (२) सुनील छगनराव दहिवाळ, वय ५४ वर्ष, धंदा व्यापार, रा. दुधाळ बिल्डींगचे मागे, सावता नगर, जिजामाता चौक, बीड ता. जि. बीड (३) संगीता दिनकर बागडे, वय ५७ वर्ष, धंदा घरकाम, रा. श्री साई सदन, मोंढा रोड, दुधाळ बिल्डींगचे मागे मसरत नगर, बीड ता. जि. बीड (४) सविता राधेशाम उडाणसिंह, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम, रा. कृष्णाई नगरी, गेवराई जोरी ता. गेवराई जि. बीड, (५) वनीता गणेश बेदरे, वय ४७ वर्ष, धंदा घरकाम रा. क्रांती नगर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड

विरुध्द

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत छगनराव बप्पाजी दहिवाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत छगनराव बप्पाजी दहिवाळ यांचा मृत्यु दि. १८/०२/२०१५ रोजी जिल्हा रूग्णालय, ता.जि. बीड** येथे झाला आहे. अर्जदारक १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे तर अर्जदार क. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कोर्ट कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत छगनराव बप्पाजी दहिवाळ** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११ माहे जून २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७ जुलै २०२५.

**(मार्फत- ॲड. राम ज. दहिवाळ)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.१७ जून २०२५ पान ४

## विद्युत सुरक्षा करी जीवन रक्षा !!

**बीड । प्रतिनिधी**

आपणास माहीतच आहे वीज दिसत नाही. पाणी हे विजेचे चांगले वाहक असल्याने विजेपासून प्रामुख्याने पावसाळ्यात अधिक सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. त्यामुळे जीवित व वित्त हानीचा धोका निर्माण होतो. विद्युत सुरक्षेबाबत खालील खबरदारी घेतल्यास विद्युत अपघात टाळता येऊ शकतात.

घरात घ्यावयाची खबरदारी– इलेक्ट्रिकल स्वाकेट मध्ये धातूच्या वस्तु घालू नये. ओल्या हातांनी किंवा पायांनी विद्युत उपकरण हाताळू नये. योग्य जोडणी नसलेली / तुटलेली वायर किंवा प्लग वापरू नये. भिजलेल्या भागात विद्युत उपकरणे लावू नयेत, लहान मुलांना विद्युत उपकरणांपासून दूर ठेवावे. उपकरणाचा वापर झाल्यावर लगेचच प्लग बंद करून पीन काढून ठेवावी. मोबाइल चार्जिंग सुरू असताना वापर करू नये, एकाच मल्टी पीन स्वाकेट मध्ये अनेक उपकरणे जोडू नये. स्वतः वायरिंग दुरूस्ती करू नये. विद्युत सुरक्षा उपकरणे ELCB / RCCB नेहमी कार्यान्वित ठेवावी. ▶▶ उर्वरित पान २ वर



*सोमवार पासून शाळा सुरु झाल्या असून... शाळेत जाणार नाही असेच मूल म्हणत असावे त्याच्या आईने अशाप्रकारे शाळेत ओढत घेऊन जात असतानाचे छायाचित्र.*

# शाहीन अकादमीच्या अल्मा फातिमा ने बीड जिल्ह्याचे नाव देशभरात गाजवले

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अल्मा फातिमा असद अली या विद्यार्थिनीने नुकत्याच जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात घवघवीत यश संपादन करत श्रेणी रँक ९४० आणि ९९.८७ पर्सन्टाईल मिळविले आहे. या दणदणीत निकालामुळे तिची सुप्रसिद्ध एम्स रुग्णालयामध्ये एमबीबीएसची जागा निश्चित झाली आहे. तिच्या या यशामुळे शाहीन अकॅडमी बीड मध्ये तिचा पालकांसोबत जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटचे अध्यक्ष डॉ. अब्दुल कादिर, अब्दुल हसीब सर आणि अब्दुल मुकीद सर ही त्रिमूर्ती फक्त सधन घरातील विद्यार्थीच चांगले घडवीत आहेत असे नाही तर





समाजाच्या तळागाळातील विद्यार्थ्यांना सुद्धा मदतीचा हात देत, त्यांच्यातील गुणवत्ता हेरून, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून यशस्वी करत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शाहीन अकॅडमी मध्ये अशारीतीने उत्कृष्ट शिक्षण देण्याचे कार्य केले जात आहे. या अकॅडमीच्या देशभरात अनेक शाखा आहेत. या सर्वच शाखांमध्ये शाहीन अकॅडमीचे विद्यार्थी उल्लेखनीय यश मिळवीत आहेत. बीड शहरासह संपूर्ण भारतात आणि परदेशात सुद्धा शैक्षणिक संकुले सुरू करण्यात आली आहेत. विभागीय कार्यालय बिदर कर्नाटक येथे शाहीन अकॅडमीच्या पहिल्या शाखेची सुरुवात करण्यात आली होती. तिथे लावलेल्या या शैक्षणिक रोपट्याचे आज संपूर्ण भारत भरात अनेक ठिकाणी शाखा आहेत. प्रत्येक शाखेमध्ये पहिली शाखा असलेल्या बिदर सारखेच शिक्षणतज्ञ शिक्षक कार्यरत आहेत. बीड शहराची शाखा सुद्धा याला अपवाद नाही. येथेही तज्ञ व पारंगत शिक्षक विद्यार्थ्यांच्या दिमतीला आहेत. यामुळेच अल्मा फातिमा सारखी विद्यार्थिनी स्वतःच्या अभ्यासासोबतच तज्ञ शिक्षकांनी शिकविलेल्या शिक्षणामुळे नीट च्या परीक्षेत मोठी झेप घेऊ शकली. आणि संपूर्ण भारतातून नीट परीक्षा दिलेल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये दणदणीत यश मिळवू शकली.

▶▶ उर्वरित पान २ वर

### लाखो शेतकरी व हजारो युवकांना उद्योजक बनवणारे अवलिया

## डॉ. प्रशांत गवळी सरांची बोधेगावातील शेतकर्यांनी घेतली भेट

**तलवाडा । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील तमाम अठरा पगड जाती धर्मातील माणसाने विशेष करुन नव तरुणांनी जगात ताठ मानने जगावे व आर्थिक संपन्नता त्यांच्या जिवनात यावी हा मुळ उदेश्य व ध्येय मनाशी बाळगुन गोफार्मली कंपनीची ११ युनिट स्थापन करून महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांचे जिवन आनंदमयी करण्याचे नुसते स्वप्नच नव्हे तर अनुकरणीय स्वरूपात वास्तव्यात आणनारे अवलिया प्रशांत गवळी सर यांनी मोठ्या प्रमाणात एक सामाजिक उपक्रम राबवला आहे. गवळी सरांनी महाराष्ट्रातील माणसांठी एक ऊर्जा स्त्रोत व प्रेरणादायक पाऊल ऊच्चलले आहे. डॉ. प्रशांत गवळी सरांच्या (पुणे) नारायणगाव येथील युनिटला प्रतेक्ष भेट देत शेवगाव तालुक्यातील बोधेगाव ग्रामस्थांनी डॉ. प्रशांत गवळी सर, एग्रीकल्चर कमिश्नर कृषि आयुक्त (यु ए ई) भारत सरकार यांची भेट घेतली

▶▶ उर्वरित पान २ वर



## जि.प.ची काजीपार येथील नूतन प्राथमिक शाळा मोडकळीस तरीही वर्ग सुरू

### पावसाळ्यात कुठल्याही क्षणी शाळा कोसळू शकते विद्यार्थ्यांच्या जीवनात धोका

**परळी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद अंतर्गत काझीपार नूतन प्राथमिक शाळा परळी येथे ज़िपची शाळा अनेक वर्षापासून सुरू आहे.शाळेची स्थापना १९५३ झाली असून. ही शाळा खाजगी मालकीच्या मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांचे वर्ग भारतात. इमारतीचा मालक भाड्यापोटी वर्षाला लाखो रुपये घेत आहे. रख रखा डागडुजी थातूरमातूर



पद्धतीने करतो. ही शाळेची इमारत मोडकळीस आली असून शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. तात्काळ मोडकळीस आलेल्या इमारती मधून शाळा इतरत्र हलवा,किंवा स्थलांतरित करा. अशी मागणी या भागातील पालकांकडून केली जात आहे. दिनांक १६ जुन २०२५ पासून शाळा सुरू झाले आहेत. काजीपार शाळेची सध्या दयनीय अवस्था असून शाळा ही मोडकळी झाली आहे. ही शाळा कधीही पावसात पडू शकते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात ▶▶ उर्वरित पान २ वर

## मंत्री सावे यांच्याकडून अभिनेते डॉ.महेश कुमार यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

सुपरहिट चित्रपट वामा चे मुख्य अभिनेते डॉ. महेश कुमार वनवे यांनी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास ,अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांची १५ जून २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सदिच्छा भेट घेतली, महिला सशक्तिकरणावर आधारित चित्रपट वामा लढाई सन्मानाची च्या घवघवीत यशाबद्दल मंत्री सावे यांनी ▶ उर्वरित पान २ वर



## माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे पहिल्या दिवशी विद्यार्थींना गुलाबाचे फुल देऊन स्वागत

**तलवाडा । प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्यानंतर नवीन २०२५२६ या शैक्षणिक वर्षात आज सोमवार दिं. १६ पासून सुरुवात झाली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये किलबिलाट पुन्हा एकदा सुरू झाले आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे पहिल्या



दिवशी विद्यार्थींना गुलाबाचे फुल भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या आहेत तर पहिल्या दिवशी पुस्तक वाटप करण्यात आले आहे.यावेळी उपस्थित मुख्याध्यापक अशोक तौर, माजी सरपंच मिना विष्णू हात्ते, बळीराम शिंदे, पत्रकार आल्ताफ कुरेशी, नजीर कुरेशी, साहेबा कुराडे, राजाभाऊ डावकर, रवी मरकड, व पालक वर्ग व शिक्षक वृंद, मोठ्या संख्येने उपस्थित होते सुत्रसंचलन लाड सर यांनी केले तर आभार सिबी तौर सर यांनी मानले.

### सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) काकु कृषि महाविद्यालय बीड येथील कृषीदुतकडून दगडी शहाजणपूर ह्या...

## गावातील शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया व बीजांकुरण याबद्दल मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) कृषि महाविद्यालय बीड येथील विद्यार्थी दगडी शहाजणपूर गावातील शेतकऱ्यांना बिजप्रक्रयीचे महत्त्व पटवून दिले. हे प्रात्यक्षिक करत असताना पंचवीस शेतकरी उपस्थित होते. यावेळी गावचे सरपंच आण्णासाहेब धुतमळत हे पण उपस्थित होते.यात



कृषीदुत विश्वजीत देशमुख,ओम देवकर,नितीन ढूमणे , सोहम धानापुणे,कार्तिक काकडे, महेश गवसणे, विवेकानंद रेड्डीर, विद्यार्थ्यांनी रासायनिक व जैविक पद्धतीने बीजप्रक्रिया आणि बीजांकुरण करून दाखवले. शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यावेळी दिसून आला. त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून हे प्रात्यक्षिक बघितले. शेतकऱ्यांना आलेल्या विविध शंकांचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## आज शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या प्रदिर्घ संघर्षानंतर शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या भरती प्रक्रियेला परवानगी दिली आहे. पण शासनानेच शिक्षकेत्तर कर्मचारी बंदचा पुन्हा आदेश काढला आहे शासनाच्या या परस्पर विरोधी भुमीकेच्या निषेधार्थ जिल्हाधिकार्यांना शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने विविध मागण्यासंदर्भात निवेदन देण्यात येणार आहे.

दि. २८ मे रोजीच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिकच्या संचालकांच्या परिपत्रकामुळे या भरतीला स्थगिती देण्यात आली आहे त्यामुळे हे अन्यायकारक परिपत्रक रद्द करून शिक्षक संचालक, माध्यमिक व उच्च



माध्यमिक महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि.२८ मे २०२५ रोजी शिक्षकेत्तर पद भरती बाबत काढलेले पत्रक त्वरीत रद्द करून पद भरती सुरू करण्यात यावी. माध्यमिक शाळातील शिक्षकेत्तर कर्मचार्यांना २४ वर्षाचा दुसरा लाभ हा राज्य शासकिय कर्मचार्यांप्रमाणे पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावा, माध्यमिक शाळांतील शिक्षकेत्तर कर्मचार्यांसाठी बक्षी समितीने शिफारस केल्याप्रमाणे नवीन सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षा नंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा, माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक पदासाठी पात्र असणारे शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पवित्र प्रणालीतून वगळून विना अट शिक्षक पदावर वेतन श्रेणीत पदोन्नती देण्यात यावी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची पदे कंत्राटी पध्दतीने न भरता ती पुर्वीप्रमाणे शासन नियुक्त मान्यताप्राप्त असावी या मागण्यांचे निवेदन बीड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने आज मंगळवार दि.१७ जून रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात येणार आहे. तरी शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर, उपाध्यक्ष शेख मोहसीन, संदीप वनवे, सचिव नामदेव वाघ, कार्याध्यक्ष अविनाश कळमकर आदिंनी केले आहे.

asianpaints
रुद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. योगेश वाघीरे
९१४६७०२३२३
८१४९८०००२०
-: पत्ता :-
राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड, बीड.